ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly-Vol.1 * Issue1 * Sept - Dec 2015 * Rs.100/-

*International Refered, Registered & Recognized Interdisciplinary Multilingual Research Journal*



• Editor •

Kailas G. Kaninde

Scanned by CamScanner

RNI. MAHMUL 03374/2015-TC
ISSN 2454 - 8332

*International Registered & Recognized peer Reviewed Research Journal Related to Higher Education for all subjects*

# IMPACT FACTS

**Quarterly - vol.1 * Issue -1 * September - December 2015 * Rs. 100/-**

**Editor** :- **Kailas Ganpatrao Kaninde**
**Co-Editor** :- **Dr.Sidharth Jadhav**

## : Associate Editor :

Dr.Vijapure B. V.
Dr.Kuchekar H.S.
Dr. Bhosale B.R.
Asst.Prof. Dongre N.B.
Asst.Prof.Koreboinwad V.D.
Asst.Prof.Kumare L.N.
Asst.Prof. Pandit R.B.
Asst.Prof. Navse D.G.
Asst.Prof. Kawale S. A.
Asst.Prof. Dongre L.B.
Asst.Prof. Bansode S.R.

* This Quarterly Peer Reviwed Journal Research Impact facts includs the different opinionns of different author, upcoming researcher and for their controversial opiniouns printer, owner, publisher, editor board of journal not responsible.

* Any copy right issues like plagrism, found in any paper, here auther and research will be responsible for that but not printer, owner, publisher and editor of this impact facts.

**Impact Facts** हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक प्रकाशक व संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरिता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशाली नगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून बुद्ध विहाराच्या बाजुला, नागसेन सार्वजनिक वाचनालयाच्या समोर, समतानगर, भोकर ता. भोकर जि. नांदेड 431801 येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 21 | महात्मा जोतीराव फुले - आधुनिक मराठी कवितेचे जनक | सोनसळे राजू मधूकरराव |
| 22 | महाराष्ट्रातील सैनिकांच्या कल्याणकारी योजनांचा प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ : मराठवाडा विभाग | लेफ्टनंट आर. पी. गावंडे |
| 23 | शेतमाल विपणन आणि शेतकरी | खलाटे योगेश बबनराव |
| 24 | नोटा (NOTA) एक निवडणूक सूधारणा | प्रा. डॉ. पी.एल. ढेंगळे |
| 25 | महिलांचे मानवी हक्क आणि शिक्षण | प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे |
| 26 | क्रीडा क्षेत्रातील अध्यापन व संशोधन | प्रा.अडसरे व्ही.बी. |
| 27 | कृषी असंतोष आणि कृषी पर्यटन | प्रा.डॉ.बी.आर.भोसले |
| 28 | बा.सी.मर्ढेकर यांची कविता एक चिकित्सक विश्लेषण | प्रा. जाधव प्रल्हाद परसराम |
| 29 | बालकुपोषण आणि बालमृत्यु या भारतातील आधुनिक सामाजिक समस्या : एक अभ्यास | प्रो. डॉ. बिरादार बी. एम.<br>प्रा. शिंदे एस. आर. |
| 30 | यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण | प्रा.मोहोकार एच.एस. |
| 31 | शिवधर्म चळवळीचा कृषीविषयक दृष्टीकोण (विशेष संदर्भ सिंदखेड) | प्रा. तातेराव पवळे |
| 32 | अहेरी तालुक्यातील महिलांची अन्नभेसळ विषयक जागरूकता – एक अध्ययन | प्रा. मंगला बनसोड |
| 33 | आधुनिक भारतासमोर गरीबी आणि भूक : निर्मुलनाचे एक आव्हान | प्रा. डॉ. प्रदिप एच. गजभिये |

Scanned by CamScanner

# महिलांचे मानवी हक्क आणि शिक्षण

प्रा. एकनाथ दत्तात्रय वाजगे.
श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर (पुणे)

मानवी हक्कांची संकल्पना ही नैसर्गिक विधी या संकल्पनेचे अपत्य आहे. जन्मानेच माणूस काही मूलभूत हक्क घेऊन येतो. या गृहितकृत्यांवर ह्या हक्कांची मांडणी करण्यात आली आहे. मानवी हक्कांची संकल्पना ग्रीक व रोमन विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती तत्वज्ञानात आणि थॉमस अॅक्वायन सारख्या विचारवंतांच्या लिखानातूनही मांडली गेल्याचे दिसते. मानवी संस्कृतीच्या वेगवेगळया टप्प्यांवर मानवास जगण्याकरिता आवश्यक असणाऱ्या हक्कांसाठी निरनिराळया संज्ञा वापरल्या आहेत. मानवी हक्कांमध्ये जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, हिंसेपासून मुक्तता, धार्मिक स्वातंत्र्य, अन्न मिळविण्याचा हक्क, गुलामगिरीपासून मुक्ततेचा हक्क, व्यक्तीच्या खाजगीपणाचा हक्क, संपत्तीवर मालकीचा हक्क, क्रूर, अमाणूश व अपमानास्पद वागणूकीपासून संरक्षणाचा हक्क यांसारख्या अनेक हक्कांचा समावेश होतो.

संयुक्त राष्ट्राने मानवी हक्काची केलेली व्याख्या अशी – ''मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे माणूस म्हणून जन्मल्यामुळे सर्व मानवांना मिळाले पाहिजेत. हे हक्क उपभोगल्याशिवाय मानवांना माणूस म्हणून खऱ्या अर्थाने जगणे शक्य नाही ”

जागतिक स्तरावर १० डिसेंबर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. १९६६ साली संयुक्त राष्ट्र संघटनेने नागरिक व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय जाहिरनामा लागू केला. तो १९४८ च्या जाहिरनाम्यास पूरक मानला जातो. यामध्ये मोफत कायद्याचा सल्ला मिळण्याचा हक्क, मोफत प्राथमिक शिक्षणाचा हक्क, यासह कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ न होण्याचा हक्क या महत्वपूर्ण बाबींचा समावेश करण्यात आला. मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यानुसार विविध देशांमध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. भारतात १९९३ मध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. देशपातळीवरील मानवी हक्क आयोगाच्या धरतीवर राज्यात ६ मार्च २००१ रोजी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली.

जागतिक मानवाधिकाराच्या संदर्भात पाहिले तर भारतातील दलितांना, स्त्रियांना तसेच बालकांना मानवाधिकार विचित्र पद्धतीने नाकारले जातात. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मानवी हक्कापासून वंचित राहणारा व हक्कांच्या पायमल्लीचा सतत सामना करणारा, तसेच अन्याय, भेदभाव, सामाजिक चालीरिती, रूढी – परंपरांना बळी पडणाऱ्या महिलांचा वर्ग दिसून येतो. भारतातील सामाजिक चालीरितींमुळे रूढी परंपरांमुळे ग्रामीण महिलांना विकासात महत्व दिले गेले नाही. सांस्कृतिक, पारंपारिक विविधतेमुळे कुटूंबव्यवस्थेत दुय्यम स्थान स्वीकाराव्या लागणाऱ्या महिलांच्या हक्कांचे मोठया प्रमाणात हनन होताना दिसून येते. प्रबोधन युगानंतरही एकविसाव्या शतकात महिलांना फार मोठया अन्यायाला सामोरे जावे लागत आहे. कौटुंबिक दुय्यम स्थान, स्त्री भ्रूण हत्या, हुंडा पद्धती, कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, बलात्कार, लैंगिक छळ, आरोग्याबाबतची अवहेलना, नोकरीच्या,/ कामाच्या ठिकाणचा मानसिक – शारीरिक छळ या अनेक बाबींना महिलांना आजही सामोरे जावे लागत आहे. महिलांना समाजामध्ये मानाने जगता येणे, स्वत:चे अस्तित्व निर्माण करता येणे, रोजगार मिळविता येणे, शारीरिक व मानसिक त्रासापासून मुक्तता करून घेऊन जीवन जगण्याचा नैसर्गिक हक्क आहे. मात्र त्यांच्या या हक्कांवर मोठया प्रमाणात घाला घालण्याचे काम समाजामधूनच होताना दिसून येते. महिलांचा जन्म, शिक्षण, नोकरी, लग्न, बाळंतपण, म्हातारपण काहीच सुरक्षित नसावे ? एकीकडे देवी म्हणून गौरविणाऱ्या महिलेची दुसरीकडे गर्भातच हत्या करावी आणि हे सर्व समाजाची सुमारे निम्म्या लोकसंख्येने व्यापलेल्या घटकासंदर्भात व्हावे, ही या देशाची मोठी शोकांतिका आहे.

महिला सक्षमीकरणाशिवाय विकसनशील भारत विकसित होणार नाही, हे सत्य एकविसाव्या शतकात स्विकारावेच लागणार आहे. महिलांची समस्या परंपरेने जुनी, व्यापक आणि सामाजिक, धार्मिक जीवनाशी निगडित असल्यामुळे त्यावर दिर्घकालीन उपाय शोधणे गरजेचे आहे.त्यासाठी शाश्वत कायदयांबरोबरच



Scanned by CamScanner

समाजाचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रबोधन हाच महत्वाचा मार्ग आहे.शिक्षणामुळे निश्चितच आत्मविश्वास निर्माण होतो. स्वाभिमानाची जाणीव होते आणि व्यक्तिमत्वही विकसित होते.

संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले तसेच आत्तापर्यंत १९७५मध्ये मेक्सिको, १९८० मध्ये कोपनहेगन , १९८५ मध्ये नैरोबी , आणि १९९५ मध्ये बिजिंग येथे महिला संम्मेलने घेण्यात आली.

महिलांच्या प्रश्नासंदर्भात भारतात राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९० च्या अधिनियमानुसार ३१ जानेवारी १९९२ रोजी करण्यात आली. या संविधानिक आयोगामध्ये एक अध्यक्ष व ५ सदस्य असतात. केंद्र सरकारकडून निवड होणाऱ्या या सदस्यांमध्ये किमान एक महिला सदस्य ही अनुसूचित जाती जमातीची असावी, असा दंडक ठेवण्यात आला आहे. समाजामध्ये चालणाऱ्या हुंडा, मानसिक छळ, बलात्कार तत्सम तक्रारी दाखल करून त्यावर न्याय देणे, महिला हक्काशी संबंधित कायदे निर्मिती व दुरूस्ती या संदर्भात सुचना करणे, गरजू महिलांना समुपदेशन करणे इ. कामे महिला आयोगामार्फत केली जातात. केंद्रीय स्तरावरील महिला आयोगाच्या धरतीवर भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १५, १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधित हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्यासाठी १९९३ मध्ये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. १९९४ मध्ये महिला धोरण राबविण्याचा पहिला मान महाराष्ट्र राज्याला मिळाला आहे.

**राज्यघटना व महिलांचे मानवी हक्क**

भारतीय राज्यघटनेमध्ये महिलांच्या विकासासाठी काही महत्वपूर्ण कलमांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यघटनेने महिलांना व्यापक असे अधिकार प्रदान केले आहे. भारतीय संविधानाच्या कलम १४ नुसार भारतातील सर्व नागरिकांना समानतेचा हक्क देण्यात आलेला आहे. यामध्ये कायदयासमोर समानता, सामाजिक समानता, सरकारी नोकरीमध्ये समानता, यामहत्वाच्या हक्कांचा समावेश होतो. कलम २३ अन्वये मनुष्य विक्रीस बंदी व कलम २४ नुसार बालमजुरीस फाटा देऊन शोषणाविरोधी अधिकार दिलेले आहे. कलम २५ ते २८ द्वारे धार्मिक बाबींचे अधिकार देण्यात आलेले आहेत. कलम १६ नुसार सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये समानतेचा अधिकार देण्यात आलेला आहे. कलम ३२ नुसार समान कामास समान मोबदला देण्याचा हक्क समाविष्ट करण्यात आला आहे.

विविध कायदे व महिलांचे मानवी हक्क

मानवी हक्क आयोग व महिला आयोगाबरोबरच भारतामध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत यामध्ये,

**विवाहासंबंधी कायदे :—**

हिंदू विवाह कायदा १९५५ ,हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८५६ ,आनंद विवाह कायदा १९०९, मुस्लिम स्त्री घटस्फोट हक्क व संरक्षण कायदा १९८६, ख्रिस्ती विवाह कायदा १८९२, धर्मांतरीत व्यक्ती विवाह विच्छेद कायदा १८६६

**मालमत्ते संबंधी कायदे :—**हिंदू उत्तराधिकारी कायदा १९५६, विवाहित स्त्रियांच्या संपत्तीचा कायदा १९५९, हिंदू वारसा हक्कात मालमत्तेत समान वाटप कायदा २००५

**फौजदारी कायदे :—** स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६, अनैतिक देहव्यापार प्रतिबंध कायदा १९५६, वैद्यकीय गर्भपातन कायदा १९७१, हुंडा प्रतिबंध कायदा १९६१, बालविवाह निर्बंध कायदा १९८७, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा १९९४, कुटूंब न्यायालय कायदा १९८४

**कामगार,नोकरदार महिलांसाठी कायदे :—** मातृत्व लाभ संबंधी कायदा १९६१, किमान वेतन कायदा १९४८ , वेठबिगार प्रतिबंधक कायदा १९७६, समान वेतन कायदा १९७६, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करणारा कायदा २०१३ ,कौटुंबिक छळ ( महिला संरक्षण ) प्रतिबंधक कायदा २००५



Scanned by CamScanner

याबरोबरच इतर अनेक कायद्यांचा आधार देखील महत्वाचे ठरतात. २००८ मध्ये संमत झालेल्या घरेलू कामगार कल्याण विधेयकाने मोलकरणींना प्रथमच कामगार म्हणून मान्यता मिळाली. मोलकरणींसाठी विधेयक करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. त्याचबरोबर १९७९ मध्ये महिलांविरूद्ध केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावाच्या उच्चाटनासाठीचा करारनामा हा अतिशय महत्वाचा व पुरोगामी समानतेची व्यापक व्याख्या करणारा करारनामा ठरला आहे.प्रसुतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

बालविवाह, बलात्कारविरोधी, हुंडाबळीचा कायदा हे कायदे स्त्री शोषणाच्या अंताचा एकमेव मार्ग नाही तरीही सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये हे कायदे महत्वाची भूमिका बजावत असतात.

महिलांच्या हक्काचे रक्षण करणाऱ्या कायद्यांबरोबरच महिलांच्या सबलीकरणासाठी देश व राज्य पातळीवर विविध योजनाही सरकारमार्फत राबविल्या जातात. यामध्ये महिलांना प्रशिक्षण व रोजगार सहायता कार्यक्रम १९८७, स्वयंसिद्धा, स्वाधार २००१–०२ , बालिका समृद्धी योजना १९९७, जिजामाता आधार योजना १९९९, ग्रामीण महिला व बालकांचा विकास कार्यक्रम १९८३, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, सुकन्या समृद्धी योजना या सारख्या योजना सरकारमार्फत राबविल्या जातात. याशिवाय मातृत्व अनुदान योजना, किशोरी योजना , जननी सुरक्षा योजना, सावित्रीबाई फुले कन्यारत्न योजना, राजमाता जिजाऊ बालआरोग्य आणि पोषण मिशन, जिजामाता महिला आधार योजना या योजना विविध स्तरावर राबविल्या जातात.

२००१ २००२ मध्ये भारत सरकारने 'स्वाधार' ही महत्त्वपूर्ण योजना सुरू केली. निराधार विधवा नैसर्गिक आपत्तीमुळे एकाकी पडलेल्या महिला तसेच तुरूंगवासानंतर निराधार झालेल्या महिलांसाठी ही योजना जाहीर करण्यात आली. भारत सरकारच्या योजनेबरोबरच जिजामाता आधार योजनेसारखी महत्वाची योजना राज्यसरकारने जाहीर केली. कुटूंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनानंतर विधवेला मदत म्हणून १९९९ पासून ही योजना सुरू केली. अत्यल्प उत्पन्न गटातील महिलांसाठी ही योजना महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेली आहे. ग्रामीण भागातील महिला व बालकांसाठी सरकारने १९८३ /८४ मध्ये देशपातळीवर ग्रामीण महिला व बालकांचा विकास कार्यक्रम जाहीर केला. यामध्ये १० ते १५ महिलांच्या गटासाठी २५००० रूपये देण्यात येतात. पापड, शिवणकाम, खडू तयार करणे या सारखे व्यवसाय यामध्ये केले जातात.एकाकी निराधार महिलांना वर्षभर राहण्यासाठी शासकीय वसतीगृहाची सोय तसेच दरमहा ५०० रूपये अर्थसहाय देणारी 'माहेर' योजना ही देखील महत्वपूर्ण योजना आहे.

भारतीय राज्यघटना, मानवी हक्क आयोग, महिला आयोग, महिलासंदर्भात वेळोवेळी केले जाणारे कायदे या सर्व बाबी असूनही महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक मात्र झालेली दिसून येत नाही. जगातील सर्वच राष्ट्रांमध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ मानला जातो. लिंगभेदावरून स्त्री पुरूष असमानता निर्माण झालेली असल्यामुळे स्त्रियांना सर्वच क्षेत्रात पुरूषांपेक्षा कनिष्ठ मानून त्यांना अन्यायाची वागणूक दिली जात आहे. स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ व दुय्यम होण्याचे प्रमुख कारण म्हणजे भाततातील धार्मिक चलीरिती व पारंपारिक प्रथा होय.

कौटुंबिक हिंसाचार, हुंडा बलात्कार, कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक छळ संपलेला नाही. महिला आयोगाकडे येणाऱ्या तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसून येत आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे महिलांच्या मानवी हक्काविषयी समाजामध्ये व विशेषता महिलांमध्येच जागृती असल्याचे दिसून येत नाही. मानवी हक्काविषयी ,स्त्रियांच्या हक्कांविषयी शिक्षणातून जनजागृती होणे गरजेचे आहे.

**महिला मानवी हक्कातील शिक्षणाची भूमिका.**

१. समाजामध्ये पिढयानपिढया कुटूंबात दुय्यम दर्जा दिल्याने कौटुंबिक अत्याचारापासून मुक्ततेसाठी, स्त्रियांना त्यांच्या हक्कांची माहिती होण्याच्या दृष्टीने शिक्षण महत्वाची भूमिका पार पाडते.

२. समाजामध्ये बलात्कार, लैंगिक छळ, शारीरिक व मानसिक अत्याचारापासून संरक्षण मिळविण्यासाठी त्या विषयीच्या तरतुदींची माहिती संक्रमित होऊन स्त्रियांच्या सबलीकरणास मदत मिळण्याच्या दृष्टीने शिक्षण महत्वाचे ठरते.



Scanned by CamScanner

३. समाजिक रूढींमुळे उद्‌भवणाऱ्या स्त्री–पुरूष भेदाभेद, हुंडा प्रथा, बालविवाह या समस्यांना सामोरे जाण्याची वृत्ती विद्यार्थिनींमध्ये निर्माण होण्यासाठी मानवी हक्कांचे शिक्षण गरजेचे आहे.
४. स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कासाठी, समानतेसाठी आणि त्यांच्या सबलीकरणासाठी महाविद्यालयीन स्तरावर त्यांना योग्य ज्ञान व माहिती मिळून सक्षम समाज निर्मितीमध्ये त्यांचे योगदान मिळण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना मानवी हक्कांचे शिक्षण मिळणे गरजेचे आहे
५. महिलांवर दिवसेंदिवस अत्याचारात होणाऱ्या वाढीमुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या अत्याचाराविरोधी असणाऱ्या विविध कायद्यांची माहिती शिक्षणाच्या माध्यमातून संक्रमित होवून महिलांच्या सक्षमीकरणास मदत होते.
६. महाविद्यालयीन जीवनानंतर गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थिनींना महिलांच्या हक्काविषयी माहिती शिक्षणाच्या माध्यमातून मिळते. कुटूंबव्यवस्थेच्या या महत्वाच्या घटकास महिला मानवी हक्कांची जाणीव झाल्यास स्त्रियांच्या कौटुंबिक दर्जात सुधारणा होण्यास मदत होते.
७. आजची महाविद्यालयीन विद्यार्थिनी उद्याची गृहिणी, आई तसेच विविध नातेसंबंधातून कुटुंबातील महत्वाची भूमिका पार पाडणार आहे. प्रस्तुत संशोधनातून तिने अवगत केलेल्या ज्ञानाचा फायदा कुटुंबातील व्यक्तींबरोबरच भावी पिढीमध्ये संक्रमित होऊन संस्कारक्षम आणि महिलांच्या सन्मानाची आणि तिच्या हक्काची जपवणूक होण्यास महत्वाची ठरणार आहे.
८. महाविद्यालयीन शिक्षणानंतर विद्यार्थिनी नोकरी, व्यवसाय, स्वयंरोजगारानिमित्त विविध स्तरावर कार्यरत होणार आहेत. मानवी हक्का विषयी–स्त्रियांच्या हक्काविषयी त्यांनी संपादन केलेले ज्ञान त्यांना त्या त्या क्षेत्रात स्त्रियांच्या सन्मानासाठी त्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

थोडक्यात, महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव होण्यासाठी आणि त्यातून त्यांचे सक्षमीकरण होण्यासाठी शिक्षण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना मानवी हक्कांची माहिती मिळाल्यास समाजवरिवर्तनामध्ये त्या महत्वाची भूमिका पार पाडतील.

संदर्भ :–

१. देहाडराय, स्वा. तांबे अ. (२००९), *स्त्रिया कायदा आणि राजकारण.* पुणे : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र. पृष्ठ. क्र. ४३.
२. जुन्नरकर, ध. (२०१५ मार्च.१४), *महिला आणि मानवी हक्क.* जर्नलिस्ट व्हीव. djunnarkar.blogspot.in
३. महावर, सु. (२०११), *राज्य एव महिला मानवाधिकार* . जयपुर : पोइन्टर पब्लिशर्स. पृष्ठ क्र. ७८.
४. बेडसे, म. सा. (मार्च २०११), *महिलांच्या हक्काचे संरक्षण* .योजना, पृष्ठ क्र. ५१.
५. माहेश्वरी, अ. (२०११), *महिला अधिकार और कानून* . जयपूर : प्रिज्म बुक्स. पृष्ठ क्र. १६.
६. पाटील, कृ. (मार्च २०१५), शिक्षण संक्रमण. पृष्ठ क्र. ६१.
७. चव्हाण, उ. म. (ऑगस्ट २०११), *स्त्री विषयक बदलते सामाजिक संदर्भ.* योजना. पृष्ठ क्र. ५२.
८. सुपे, टी. एन. (मार्च २०१०), *ज्ञानरचनावाद.* शिक्षण संक्रमण, पृष्ठ क्र.१०.
९. जोशी, बी. आर. (२००७), *सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा कोश– शिक्षणशास्त्र.* पुणे : डायमंड पब्लिकेशन. पृष्ठ क्र. ७१.
१०. http://www.humanrights.com/educators/why-human-rights
११. http://en.wikipedia.org/wiki/humanrirhtseducation
१२. http://www.hrea.org/



Scanned by CamScanner